**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी घेतला परीक्षा विभागाचा आढावा

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी आज परीक्षा विभागात भेट देवून परीक्षा विभागाच्या प्रगती कार्याचा आढावा घेतला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी परीक्षा विभागाने गेल्या पाच वर्षात केलेल्या प्रगतीचा अहवाल पी.पी.टी. द्वारे कुलगुरूंसमोर सादर केला. सादरीकरणामध्ये त्यांनी परीक्षा विभागातील कामकाजाची माहिती, पदवी प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे, आचार्य पदवी संबंधिची प्रक्रिया, नामांकन, परीक्षा पद्धती, संशोधन, आय.सी.आर. याशिवाय निकाल प्रक्रिया, परीक्षा मंडळाचे कार्य, असे एकूणच त्यांनी परीक्षाविषयक कामकाज जाणून घेतले.

यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, मुख्य मूल्यांकन अधिकारी डॉ.के.बी. देशमुख, परीक्षा विभागातील सहा. कुलसचिव (परीक्षा) सौ. मोनाली तोटे पाटील, सहा. कुलसचिव (सारणी) श्री अनिल काळबांडे, सहा. कुलसचिव (परीक्षा) श्री दिपक वानखडे, सहा. कुलसचिव (आचार्य पदवी व नामांकन) सौ. मिनल मालधुरे आदी उपस्थित होते.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. २१/०९/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी